ई- मेल द्वारे


**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१**

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६ Email- ddtp.urc@maharashtra.gov.in


## -: कार्यालयीन परिपत्रक :-

## परिपत्रक क्र.०१/२०२५

**विषय** : प्रादेशिक योजना क्षेत्रातील भाग नकाशे व झोन दाखले देणे या सेवा नागरिकांना ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीचा वापर सुरू करणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संचालनालयातर्फे प्रादेशिक योजना क्षेत्रातील भाग नकाशे आणि झोन दाखले या लोकसेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित केलेल्या तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांसाठी नव्याने संगणकीकृत प्रणालीवर आधारित ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे.

सदर ॲप्लीकेशनसाठी युआरएल लिंक खालीलप्रमाणे आहे.

**https://rppartplan.maharashtra.gov.in/**

सदर ॲप्लीकेशनमध्ये अर्जदारांना शुल्क भरण्यासाठी पेमेंट गेटवे इंटिग्रेशन करणे प्रस्तावित असून, सद्यस्थितीत पर्यायी मार्ग म्हणून ऑफलाईन / ग्रास प्रणालीमार्फत शुल्क भरण्याची सुविधा सदर ॲप्लीकेशनमध्ये उपलब्ध करण्यात आली असून, त्यानुसार ॲप्लीकेशन वापरायोग्य विकसित करण्यात आले आहे.

तसेच सदर ॲप्लीकेशनचे आपले सरकार पोर्टल सोबत इंटेग्रेशन झाले असल्याने सदर सेवा आपले सरकार पोर्टलवर वापरास नागरिकांना उपलब्ध आहेत.

सदर सेवा नागरिकांना अधिक कार्यक्षमतेने ऑनलाईन माध्यमातून पुरविण्यासाठी संचालनालयातर्फे विकसित करण्यात आलेले आर.पी. पार्ट प्लॅन आणि झोन सर्टिफिकेट ॲप्लीकेशनस् दि.०९.०६.२०२५ पासून नागरिकांना वापराकरिता उपलब्ध करून देण्यात येत आहे.

त्यानुसार आता, यापुढे प्रादेशिक योजना क्षेत्रातील भाग नकाशे व झोन दाखले देण्याबाबतची कार्यवाही संचालनालयाचे अधिनस्त नगर रचना शाखा कार्यालयांनी दि.०९.०६.२०२५ रोजीपासून ऑनलाईन स्वरूपातच

करण्यात यावी. तसेच नागरिकांना ऑनलाईन स्वरुपात पोर्टलवर अर्ज सादर करण्यासाठी योग्य ते सहाय्य करण्यात यावे. शासन निर्णय क्र.संकीर्ण-५०१९/प्र.क्र.११४/२०१९/नवि-२७, दि.२८.१०.२०२० नुसार भाग नकाशे / झोन दाखले ऑनलाईन देण्याकरिता शुल्क आकारण्यात यावे.

सदर पोर्टल बाबत नागरिकांना माहिती देण्यासाठी व प्रशिक्षित करण्यासाठी शाखा कार्यालयांचे स्तरावरून योग्य ते प्रयत्न करण्यात यावेत. पोर्टल वापरणेबाबतचे User manual सदर पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

(मूळ मसुदा मा.संचालक यांनी मंजूर केला असे.)

(किशोर गोखले)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

जा.क्र.नासंघ/परिपत्रक/भाग नकाशा-झोन दाखला पोर्टल/ २८५६
दिनांक : ०४ /०६/२०२५.

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

१. मा.अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-१३), मंत्रालय, मुंबई -३२.
२. सहसचिव, नगर विकास विभाग(नवि-२७), मंत्रालय, मुंबई -३२
३. सहसंचालक, नगर रचना, अमरावती/ छत्रपती संभाजी नगर / कोकण / नागपूर / नाशिक / पुणे विभाग
४. उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे.
५. सहायक संचालक, नगर रचना, सर्व शाखा कार्यालये.